# पाद्री मिगेल–द–आल्मैदविरचीत ‘वनवाळ्याचो मळो’ या सतराव्या शतकातील ग्रंथाच्या लिपीचे स्वरूप



डॉ. सुनिता उम्रस्कर

कोणत्याही भाषेतील ध्वनीला लेखी (दृश्य) रूप देण्याची रीती म्हणजे लिपी होय. मानवी संस्कृती जितकी पुरातन आहे तितकीच लिपीही आहे असे म्हणता येईल. ‘ब्राह्मी’ ही भारतातील सर्वांत प्राचीन लिपी असे मानण्यात येते. ‘मौर्य काळात प्राय: सर्व भारतात तिचा प्रसार झाला होता... सनपूर्व ५व्या शतकापर्यंत तिचा काळ जातो. ब्राह्मी लिपीला तीन हजार वर्षांचा इतिहास आहे,’ असा संदर्भ ‘भारतीय संस्कृतीकोशा’मध्ये सापडतो. गोव्यातील सर्वांत जुना असा शिलालेख ब्राह्मी लिपीतला असून त्याची भाषा प्राकृत अथवा संस्कृत आहे.[१]

सम्राट अशोकांच्या काळातही म्हणजे इ. स.पूर्व २७५ ते २३२ मध्येही ही लिपी भारतात प्रचलित होती. तिच्यापासून सर्व भारतीय लिप्यांचा विकास झाला असे मानण्यात येते. या ‘ब्राह्मी’ लिपीचेच एक रूप म्हणजे ‘नागरी लिपी’ होय. संस्कृत, हिंदी व मराठी या भाषा ज्या लिपीत लिहिल्या जातात, तिला ‘नागरी’ किंवा ‘देवनागरी लिपी’ असे म्हणतात.

देवनागरी लिपी भारतात तर युरोपात रोमन लिपीचा वापर करण्याची परंपरा दिसते. इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज, स्पॅनिश या युरोपीयन भाषांच्या लेखनपद्धती रोमन मुळाक्षरांवर आधारलेल्या आहेत. युरोपातील सगळ्या प्रमुख भाषांची लिपी ही लॅटिन लिपी पासून झालेली

दिसते. रोमन लिपीचाही उगम लॅटिन लिपीपासूनच झालेला आहे. या दोन्ही लिपी या प्राचीनतम लिप्या मानल्या जातात. देवनागरी व रोमन लिपीतील वेगळेपणा म्हणजे देवनागरी लिपीत ५२ वर्ण आहेत, याशिवाय विदेशी भाषांच्या संपर्कामुळे आणखी काही वर्ण संमिलीत झालेले आढळतात. उदा. ऑ, ॲ इत्यादी. रोमन लिपीत एकूण २६ वर्ण आहेत. त्यामुळे या लिपीत देवनागरीप्रमाणे सर्व ध्वनींना रुपबद्ध करण्याची क्षमता उणी असलेली दिसून येते. देवनागरीतील 'ख्', 'घ्',' च्', 'छ्', 'झ्', 'ठ्', 'ढ्', 'ण्', 'थ्', 'ध्', 'भ्', 'श्', 'ष्', 'ळ्', 'क्ष्' अशासारख्या ध्वनींना रोमन लिपीत स्वतंत्र लिपीचिन्ह नाही, म्हणून रोमन लिपीतील बहुतेक सर्व वर्ण व ध्वनी देवनागरी लिपीत व्यक्त होऊ शकतात असे म्हणता येते. असे असले तरी व्यक्ती व समुहागणिक प्रत्येक लिपीतील उच्चारस्थानात वेगळेपण जाणवते. एकाद्या कालखंडात एकाद्या शब्दाचे उच्चारण कसे होत होते हे स्पष्टपणे व ठाम पणे नोंदविता येणे अवघड आहे.

देवनागरी लिपीतील वर्णमाला ही त्याच्या उच्चारण स्थानानुसार वर्गीकृत केली जाते. प्रारंभी स्वरांची मांडणी केलेली असून त्यानंतर व्यंजनांची मांडणी केली आहे. स्थानाच्या दृष्टीने देवनागरी वर्णमालेत प्रथम कंठ्य त्यानंतर तालव्य, मूर्धन्य, दन्त्य आणि ओष्ठ्य या क्रमाने ध्वनी येतात. अशी मांडणी रोमन लिपीमध्ये आढळून येत नाही.

सर्वसाधारणपणे एका ध्वनीसाठी देवनागरीत एकच लिपीचिन्ह वापरले जाते. तर रोमन लिपीमध्ये एका ध्वनीसाठी अनेक लिपीचिन्हे वापरली जातात. उदा. 'क' साठी k (King, Kettle), Q(Queen, Question), C(Cake, Camera), Ch(Chemical, Christmas) अशा सारखी वेगवेगळी लिपीचिन्हे वापरली जातात. 'ख्' साठी 'kh' ही वर्णव्यवस्था आहे. 'क' साठी 'C' चा वापर होत असला तरी 'ख' साठी 'Ch' चा वापर होत नाही. तो 'च' तसेच 'क' साठी होतो. तसेच 'श' साठी Sugar, shirt, issue, session, generation, suspicious, anxious, subconscious अशासारखी लिपीचिन्हे वापरली जातात. 'व' साठी 'w' आणि 'v' चा वापर केला जातो. 'u' या लिपीचिन्हाचा उच्चार 'उ' असा होतो तर 'but' चा उच्चार 'बट' व 'put' चा उच्चार 'पुट' असा होतो. रोमन लिपीतले शब्दातील आदी-मध्य ध्वनी अनेकदा अनुच्चारित राहतात. उदा. Psychology, Knowledge इत्यादी. याचे लिप्यंतर प्सायकोलोजी, क्नोलेज असे केले जात नाही. देवनागरी लिपीत प्रत्येक लिखित वर्णाचा उच्चार केला जातो. त्याचप्रमाणे 'G' चा उच्चार 'ग' असाहोतो. तसाच तो 'ज' असाही होतो. उदा. Garden, geography इत्यादी.

**मिशनऱ्यांनी केलेला रोमन लिपीचा वापर:** धर्म आणि लिपीचा संबंध फार पुरातन आहे. गोव्यात अनेक परकीय राजवटी होऊन गेल्या त्यामुळे वेगवेगळ्या भाषांची सत्ता गोव्यावर निर्माण झाली. कदंबाच्या राजवटीत कानडी भाषा व आदिलशाहाच्या कारकीर्दित फारशी भाषेचा संचार झाला. कन्नड लिपीतील काही जुने शिलालेख व ताम्रपटे आढळतात त्यावरून कानडी भाषा ज्याला हळेकन्नड असे म्हटले जाते ती भाषा गोव्यात प्रचलीत नसली तरी तिची लिपी जुन्या काळी लेखनासाठी वापरली जात असे. पोर्तुगीजपूर्वकाळापासून देवनागरी, मोडी, कानडी अशा लिप्यांचा वापर करण्यात येत होता. यावरून ज्या ज्या वेळी नवी राजसत्ता प्रस्थापित झाली त्या त्या वेळी ती आपली भाषा व लिपी घेऊन आलेली आहे.

पोर्तुगिजांचे गोव्यात आगमन झाल्यानंतर त्यांनी गोव्यावर सत्ता काबीज केली. त्याच काळात इंक्विझिशनला सुरुवात झाली. इंक्विझिशनच्या काळात गोव्यातील हिंदू धार्मिक ग्रंथांवर बंदी घालण्यात आली. हिंदू धर्मीयांच्या कथापुराणातील उतारे रोमन लिपीत लिहून घेऊन ख्रिस्ती

मिशनरी आपल्या संग्रही ठेवीत असत व त्याचा वापर ते आपल्या लेखनामध्ये करीत असत. पोर्तुगिजांनी भारतातील किंबहुना गोव्यातील जनतेला साक्षर करायचे तर ते रोमन लिपीतच आणि नंतर त्यांना त्याच लिपीतील धर्मग्रंथ वाचायला द्यायचे असे धर्मविषयक धोरण स्वीकारलेले दिसते.

मराठी साहित्याच्या इतिहासात ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचे स्वतंत्र दालन उघडणाऱ्या प्रा. अनंत काकबा प्रियोळकरांनी ख्रिस्ती मराठी लेखकांच्या रोमन लिपीतील लिखाणाचे स्वरुप समजून घेऊन लिप्यंतर पद्धतीचे निकष सिद्ध केले आहे. शिवाय लक्ष्मीकांत व्यंकटेश प्रभु भेंब्रे यांनीही लिप्यंतरा विषयीच्या काही नोंदी केल्या आहेत.

प्रा. प्रियोळकरांनी सांगितल्याप्रमाणे. 'जुवांव गोन्सालव्हिस या धर्मोपदेशकाच्या मनात 'Canarese' लिपीचे खिळे तयार करायचे होते. परंतु 'अक्षराचा विलक्षण आकार, उच्चार निश्चित करण्याची अडचण व ही भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश लहान असल्यामुळे हा विचार त्याला सोडावा लागला.'[२]

गोव्यातील पोर्तुगीज राजवटीत रोमनलिपीचा वापर करण्याचे श्रेय सर्वप्रथम गोव्यातील ख्रिस्ती मिशन-यांकडे जाते. उपलब्ध साहित्य रचनांच्या आधारे पाहू गेल्यास तत्कालीन गोव्यातील ग्रांथिक मराठी भाषेत व गोव्यातील स्थानिक भाषेत वाङ्मयनिर्मिती करण्याचे श्रेय जेजुइत पंथातील मिशनरी फादर थॉमस स्टीफन्सकडे जाते. त्यांनी एतद्देशियांच्या भाषेतच आपले वाङ्मय छापण्याची इच्छा दर्शविली होती हे त्यांनीच सासष्टी (गोवा) येथून जेजुइतांच्या जनरलला ५ डिसेंबर १६०८ रोजी लिहिलेल्या एका पत्रात नमूद केले आहे. "Before I end this letter I wish to bring before your Paternity's mind the fact that for many years I have strongly desired to see in this Province some books printed in the language and alphabet of the land, as there are in Malabar with great benefit for that Christianity. And this could not be achieved for two reasons. The first because it looked impossible to cast so many matrix amounting to six hundred whilst the characters are syllables and not alphabets as our 24 are in Europe. The other because this holy curiosity could not be put into execution, without the order and approval of the Provincial. And they have so many things to look after that they have no time to attend to this, much more to take it into hand. The first difficulty has its remedy in this that these moulds can be reduced to two hundred. The second will vanish, if Your Paternity thought it fit to write to Father Provincial, recommending him that he may do it if he feels that it will be for the greater glory of God, and edification and benefit of this Christianity. "[३]

लक्ष्मीकांत व्यंकटेश प्रभु भेंब्रे यांच्या मतानुसार स्टीफन्स व त्यांच्या नंतरचे सतराव्या शतकांतील सर्व कॅथलिक पंथीय युरोपीय लेखकांनी देवनागरीच्या ऐवजी रोमी लिपीचा उपयोग का केला, ते स्पष्टपणे कळण्यास मार्ग नाही. त्यांच्या मते सर्वसाधारणपणे पाद्री वर्गामध्ये वसत असलेला भाषाशिक्षण घेण्याविषयीचा कंटाळा हेच रोमी लिपी वापरण्याचे प्रमुख कारण असावे. आजच्यासारखे सुरेख अक्षरांत छापलेले नागरी लिपीतील ग्रंथ त्याकाळी नव्हते. हस्तलिखित ग्रंथांत आढळलेली भिन्न भिन्न पद्धतीची हस्ताक्षरे, अक्षरे रेखाटण्याच्या विविध शैली, संक्षिप्त शब्द, जोडाक्षरे लिहिण्याच्या नानाप्रकारच्या प्रवृत्ती या सर्व गोष्टीमुळे पाद्री लोकांची मने भितीग्रस्त होऊन गेली असावी त्याचबरोबर युरोपीय भाषांना अपरिचित असलेले उच्चार वर्ण, निरनिराळी अक्षरे न जुळविता उच्चार एकदम लिहिण्याची पद्धत, मोडी लिपीचा काही प्रमाणात होत असलेला वापर या गोष्टी त्यांना भांबावून टाकण्यास पुरेशा होत्या.[४]

परंतु मिशनऱ्यानी केलेले लिखाण व त्यावर असलेल्या अनेक तत्कालीन धार्मिक ग्रंथाचा प्रभाव

पाहता त्यांनी तत्कालीन ग्रंथाचा अगदी बारकाईने अभ्यास केलेला दिसतो. तसेच त्यांची ग्रंथसंपदा व त्यातील ओवीसंख्या पाहता त्यांची चिकाटी कुठेच कमी पडलेली आढळत नाही. काही अभ्यासकांच्या मते सोळाव्या शतकांत हिंदू ग्रंथांचा नाश मोठ्या हिरिरीने करण्यात आला, त्यामुळे नागरी लिपी शिकायला सोईस्कर होईल अशी पुस्तके मिळणे दुरापास्त ठरले, व यासाठी ख्रिस्ती प्रचारकांनी रोमी लिपी स्वीकारली. वास्तव पाहता असे आढळते की पाद्री लोकांना, एतद्देशीयांची भाषा शिकण्यास जितके कष्ट करावे लागतात, त्यांच्या तुलनेने देशी लोक जे सुशिक्षीत होते ते सहजगत्या पोर्तुगीज भाषेचे ज्ञान संपादन करत असत, आणि ते ज्ञानही अधिक सखोल असायचे. उच्चारांतले सूक्ष्म फरक व कमीजास्त हेल ओळखण्यात एतद्देशीयांचे काम अधिक समर्थ असते हे मिशनऱ्यांच्या अनुभवास आले होते, म्हणून लिपीज्ञानाच्या मागे लागण्याचे त्रास टाळण्यासाठी पाद्री वर्गाने धर्मांतर केलेल्या गोवेकरांकडून जुने पुराणग्रंथ रोमी लिपीत उतरून घेतले, आणि ते हाती आल्यावर मूळ ग्रंथ नष्ट करून टाकले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्टीफन्सने वरिष्ठांना लिहिलेल्या पत्रात नमूद केलेले आहे, की 'मिशनमध्ये काम करणा-या धर्मोपदेशकांपैकी एकदोघे वगळले, तर सर्वांना देशी भाषा अवगत आहे, असे त्यात म्हटले असून शेवटच्या परिच्छेदात या प्रांताच्या भाषेत व लिपीत काही पुस्तके मुद्रित झाल्यास ख्रिस्ती धर्माचा फायदा होईल असे मतही व्यक्त केले आहे. इ. स. १६०८ सालापूर्वीपासून स्टीफन्सला, गोव्यातील नवक्रिस्त्यांसाठी नागरी लिपीतील पुस्तके प्रसिद्ध व्हावी व तसे टाइप पाडले जावे, असे वाटत होते; पण त्यांच्या वरिष्ठांना ते पसंत नव्हते, त्यामुळे त्याची इच्छा फलद्रूप झाली नाही, तसेच फा. स्टीफन्सच्या काळी गोव्यातील प्रचलीत लिपी नागरी होती, एवढे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.'[५]

'सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली' ग्रंथाचे लेखक डॉ. वि. बा. प्रभुदेसाईंच्या मते ''गोमंतकातील जेजुइत धर्मोपदेशकांनी मराठीतील आणि गोमंतकी भाषेतील साहित्य रोमन लिपीतच लिहिले. रोमन लिपीच्या तुलनेने देवनागरी लिपीही पुष्कळच शास्त्रशुद्ध असल्याचे अनेक पाश्चात्य पंडीतानी मान्य केले आहे असे दिसते. ग्रांथिक मराठीत तसेच गोमंतकी भाषेत लेखन करणारा पहिला जेजुइत धर्मोपदेशक फादर तोमस स्टीफन्स यांनी देशी भाषांत तयार केलेले वाङ्मय एतद्देशियांच्याच लिपीत मुद्रित व्हावे अशी इच्छा व्यक्त केली होती; परंतु वरिष्ठांकडून पूर्व परवानगी न मिळाल्यामुळे त्यानी आपले दोन्ही ग्रंथ रोमन लिपीत मुद्रित करून प्रसिद्ध केले असावे.''[६]

कारणे काहीही असली तरी त्या काळी देवनागरी लिपी ऐवजी रोमन लिपीचाच उपयोग ख्रिस्ती लेखकांनी केलेला दिसतो. मुद्रणाच्या सोयीसाठी रोमन लिपी सोयीस्कर आहे असे मिशनऱ्यांना वाटले असावे, त्याच बरोबर धर्मप्रसार हा रोमनलिपीत झाल्यामुळे अधिकाधिक वाङ्मयाची जागा ही ख्रिस्ती वाङ्मयाने घ्यावी असे मिशनऱ्यांना वाटणे साहजिकच होते.

गोव्यातील तत्कालीन रोमन लिपीवर पोर्तुगीज भाषेचा प्रभाव होता, कारण गोव्यातील लोकभाषेत ग्रंथनिर्मिती करण्यासाठी रोमन लिपीचा उपयोग करणारे जेजुइत मिशनरी हे बव्हंशी पोर्तुगीज होते. त्यामुळे त्यांच्या भाषेतील उच्चारांचे संकेत त्यानी गोव्यातील भाषेलाही लागू केलेले दिसतात.

पोर्तुगीज वर्णमालेतील स्वर व व्यंजने डॉ. प्रभुदेसाई यांनी आपल्या 'सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली' या ग्रंथामध्ये दिलेली आहेत ती अशी आहेत.'

६ Simple vowels: a, e, i, o, u, y

२ Nasals: ã, õ

१९ Consonants: b, c, ç, d, f, g, h, j, l, m, n, p, q, r, s, t, v, x, z

४ Compound consonants: lh, nh, rr, ch
The signs w and k are only found in foreign words [७]

'ç' याला 'cedilha' असे म्हणतात. 'c' या व्यंजनासमोर 'o', 'a', 'u' हे स्वर आले असता त्या व्यंजनाचा 'स' असा मृदु उच्चार कायम ठेवण्यासाठी त्याचा उपयोग करतात. '~' याला 'tilde' असे म्हणतात. त्याचा उपयोग स्वरांच्या शीर्षभागी अनुस्वराप्रमाणे करतात.

या चिन्हाव्यतिरिक्त ´(acento agudo) उदात्त चिन्ह, `(acento grave) अनुदात्त चिन्ह, ^(acento circumflexo) स्वरित चिन्ह, ¨(trema) असंधिस्वर चिन्ह अशी चिन्हे पोर्तुगीज भाषेमध्ये आढळतात. परंतु त्याचा वापर या ग्रंथांमध्ये केलेला नाही. तसाच तो गोव्यातील भाषेमध्ये रचण्यात आलेल्या इतर ग्रंथामध्येही करण्यात आलेला नाही असे डॉ. प्रभुदेसाई यांचे मत आहे.[८]

पोर्तुगीज भाषेतील वर्णमाला पाहता त्याचे उच्चार पुढील प्रमाणे आहेत.

a (आ), b (बे), c (से), d (दे), e (ए), g (ज्ये), h (आगा), i (ई), j(जोते), l (यल), m (यम), n (यन), o (ओ), p(पे), q (के), r (यर), s (यस, झ), t (ते), v (व्हे) , x (शीज), z (झ)

**शास्त्रशुद्ध लिप्यंतर –'वनवाळ्याचो मळो' च्या संदर्भातः** 'वनवाळ्याचो मळो' हा ग्रंथ रायतुरच्या जेजुइत मुद्रणालयात १६५८ मध्ये प्रकाशित झाला. मूळ ग्रंथ हा रोमन लिपीत असून तो मुद्रित स्वरुपात आहे. 'वनवाळ्याचो मळो' याच्या तिसऱ्या खंडाची एक प्रत पणजी(गोवा) येथील गोवा शासनाच्या सेंट्रल लायब्ररीत असून त्या ग्रंथाचे मुखपृष्ठ, मुद्रणासाठी अनिवार्य असलेली आरंभीची धर्माधिकाऱ्यांनी दिलेली संमती, प्रस्तावना वगैरेचा तपशील देणारी पृष्ठे गहाळ झालेली आहेत.

'वनवाळ्याचो मळो' चा पाचवा खंड लंडन येथील 'स्कूल ऑफ ओरिएण्टल एण्ड आफ्रीकन स्ट्डीज'च्या संग्रहालयात असल्याचे डॉ. प्रभुदेसाई म्हणतात. त्याची माक्रोफिल्म्सची एक प्रत गोवा विद्यापीठातील ग्रंथालयात उपलब्ध आहे. इ. स. १६५८ मध्ये गोव्याच्या सांव पाव्ल कॉलेजमध्ये प्रसिद्ध झालेल्या पहिल्या खंडाची एकंदर २७१ पृष्ठे( फोलियोस) होती, तर या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडाचे जो गोव्याच्या सेंट्रल लायब्रेरीत उपलब्ध आहे, त्याचे मुखपृष्ठ, सुरुवातीची धर्माधिकाऱ्यांनी दिलेली छापण्यासंबंधीची संमती, प्रस्तावना वगैरे तपशील देणारी पृष्ठे गहाळ झालेली आहेत. पण या ग्रंथाच्या मुख्य विषयास ज्या ठिकाणी आरंभ होतो त्या पहिल्या पानापासून अखेरपर्यंतची एकंदर २७० पृष्ठे (फोलियोस) उपलब्ध आहेत.

पाचव्या खंडाची एकंदर पृष्ठे २७४(फोलियोस) असून तो खंड १६५९ मध्ये प्रकाशित झाला. या खंडाची आरंभापासूनची सर्व पृष्ठे आपल्याला पाहता येतात. या ग्रंथाच्या सुरुवातीलाच पाद्री आंतोनियु-द-सालदांञ्ज या प्रोव्हिंसियालच्या २१ मे १६५६ या दिवशीच्या हुकुमावरून जेजुइत पंथाच्यावतीने पाद्री इनासियु आर्कामोनि यांने हा खंड वाचून त्यामध्ये ख्रिस्ती धर्माविरुद्ध काहीच नसल्याची खात्री करून किंवा तपासून त्यावर शिक्का मोर्तब करून शिफारसपत्र दिले आहे. यावरून तत्कालीन धार्मिक ग्रंथ हे धार्मिक अधिकाऱ्यांच्या शिफारशीशिवाय मुद्रित करण्याची तरतूद नव्हती हे स्पष्ट होते.

प्रा. अ. का. प्रियोळकर, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई सारख्या संशोधकांनी १६व्या १७व्या शतकांतील रोमन लिपीमध्ये लिहिल्या गेलेल्या ग्रंथांचे देवनागरी लिपीमध्ये लिप्यंतर केले. प्रा. अ. का. प्रियोळकरांनी 'सांतु आंतोनिची जीवित्वकथा' या ओवीबद्ध मराठी काव्याचे देवनागरीत लिप्यंतर करून 'मराठी संशोधन पत्रिके'त प्रसिद्ध केले. (ऑक्टोबर १९५३-जुलै१९५४) त्यानंतर स्टिफन्सचे 'दौत्रिन क्रिस्तां', पाद्री क्रुवाचे 'ख्रिस्ताचे

वधस्तंभारोहण' व पाद्री नोरोञ्जचे 'क्रिस्ताचे यातनागीत' या मराठी काव्यांचे रोमन लिपीतून देवनागरीत लिप्यंतर केले. डॉ. प्रभुदेसाई यांनी आल्मैदविरचित 'वनवाळ्याचो मळो' च्या तिसऱ्या खंडातील २७० पृष्ठा (folios) पैकी काही भाग ( पृ. १ ते ६१ 1r to 61r) रोमन लिपितून देवनागरीत यथामूल लिप्यंतर करून तो भाग संपादित केला आहे. तसेच Old Konkani Language and Literature - The Portuguese Role या पुस्तकात डॉ. ऑलिविन्यु गॉमिश यांनी केलेल्या 'वनवाळ्याचो मळो' च्या तिसऱ्या खंडाच्या लिप्यंतराचा प्रयत्न स्तुत्य आहे.

**लिप्यंतरकारांचा लिप्यंतराविषयीचा विचार :** लिप्यंतर करताना लिप्यंतराविषयीचे स्वीकारलेले धोरण लक्षात घेऊन 'वनवाळ्याचो मळो' या ग्रंथाविषयीच्या लिप्यंतराविषयी पुढीलप्रमाणे काही मुद्दे मांडता येतील. लक्ष्मीकांत व्यंकटेश प्रभु भेंब्रे यांच्या मते इंग्रजी व फ्रांसी भाषेत उच्चार-लेखन अक्षरांच्या स्वकीय उच्चारांवर आधारलेले नसून नियमविरहित अशा रुढींवर बहुश: अवलंबून असते, हे त्या भाषेचे अध्ययन करणाऱ्या व्यक्तीच्या अनुभवास येते. त्या भाषांच्या तुलनेने पोर्तुगाली लेखनपद्धती अधिक सुलभ असली तरी तीत आजदेखील बरेचसे दोष आहेत. सतराव्या शतकात ते दोष अधिक प्रमाणात होते. तेव्हांची परिस्थिती अगदी गोंधळ माजविणारी होती. जरूर नसता कांही अक्षरे दुप्पट लिहिणे ('pp', 'tt', 'dd', 'cc') एक पुढे लिहून मागील अक्षरांशी फारसा संबंध नसलेला उच्चार दर्शविणे ('ch', 'ph', 'lh', 'nh') 'ङ्', 'ञ्', 'न्' अनुनासिक हे सारे एकाच वर्णाने सिद्ध करणे, एकच वर्णाक्षर निरनिराळ्या प्रकारे उच्चारण ('c', 's', 'x') या दोषांमुळे खुद्द त्या भाषेच्या भाषिकांना देखील लिहिलेले वाचण्यास कठीण वाटत होते. लेखन-नियमापेक्षा संवयीचा उपयोग जास्त होई.९

ऱ्हस्व 'इ' ला 'i' व दीर्घ 'ई' ला 'y' असा नियम पाद्रीनी ठरविलेला दिसतो. पण ऱ्हस्व दीर्घ नीट ओळखण्यास त्यांचे कान सरावलेले नसल्याकारणाने तो अचूक अमलात आलेला नाही. अनुनासिक 'इं' किंवा 'ईं' साठी केवळ 'ĩ' वापरलेला आहे. 'ỹ' चा उपयोग दीर्घ स्वरासाठी अधिक चांगला झाला असता. काही ठिकाणी '~' (तिल) या अनुनासिक चिन्हाऐवजी 'n' किंवा 'm' ने तो उच्चार सिद्ध केलेला आहे. असे भेंब्रे यांचे मत आहे. 'वनवाळ्याचो मळो' या ग्रंथामध्येही असे शब्द आले आहेत. दीर्घ 'ई' साठी 'y' व हस्व 'इ' साठी 'i' असे वर्ण वापरलेले आढळतात. उदा. आठैताति- atthaitati , उजिआची- vziachy इत्यादी. अनुनासिकासाठी '~' चा वापर केलेला आहे तसेच 'n' किंवा 'm' याचा उपयोग केला आहे. तसेच स्वभागी- fuabhaguy, स्वर्गि- fuargui, येकी- yequy कित्या- quitea येथे दीर्घ 'ई' साठी 'uy' व ऱ्हस्व 'इ' साठी 'ui' असे वर्ण वापरलेले आढळतात ते केवळ ऱ्हस्व 'कि' व 'गि' तसेच दीर्घ 'की' व 'गी' साठीच आहेत, इतर व्यंजनासाठी नाही.

भेंब्रे यांचे दुसरे मत असे आहे की 'उ ' ला 'u' व ' ऊ ' ला 'v' असा नियम ठरलेला आहे; परंतु पोर्तुगालीत 'v' शब्दारंभीच्या 'u' साठी योजिण्यात येई व ऱ्हस्व-दीर्घ यांची भावना त्यामागे नसे; 'उ' किंवा 'ऊ' चे रूप 'ũ', 'un', 'um' या प्रकारांनी अनियमितपणे लिहिलेले आढळते. येथे वरील दोन्ही विषयांत पुढीलप्रमाणे धोरण स्वीकारले आहे; 'ẽ' व 'ũ' हे नेहमी दीर्घच ठेवले आहे. 'in', 'im' d 'un', 'um' हे मात्र ज्या ठिकाणी योग्य वाटत तेथे ऱ्हस्व लिहिले आहेत आणि ते शक्य तेथे अनुनासिकाने किंवा अनुस्वराने न दर्शविता त्या त्या वर्गातील नासिक्य वर्णाने बनविले आहेत. भेंब्रे यांचे हे मत पाहता या ग्रंथामध्ये 'उ ' ला 'u' व ' ऊ ' ला 'v' असा नियम ठरलेला दिसत नाही.

उदा. veuegallea -वेवेगळ्या, vaftu - वस्तु, vparantẽ -उपरांतें, vmattata - उमटता इत्यादी. येथे 'v' च्या नंतर जर व्यंजन असेल तर ते

'उ' होते आणि जर 'v' च्या नंतर स्वर येत असेल तर ते 'व' असे होते. यालाही काही शब्द अपवाद आहेत. उदा. vhallanchẽ -व्हाळांचें, vhẽunu- व्हाउंनु इत्यादी 'उ' किंवा 'ऊ' चे रूप 'ũ', 'un', 'um' हा प्रकार येथे दिसून येत नाही. वास्तविक पाहता येथे ऱ्हस्व-दीर्घला महत्त्व दिलेले दिसून येत नाही. 'ẽ' व ũ हे दिर्घत्व दर्शविण्यासाठी नसून ते अनुस्वारासाठी योजिलेले दिसते. उदा. anadĩafidhapann -अनाधसिधपर्णि, rachũcheaca- रचुंच्याक, naqhetrã - नखेत्रां, fundharã - सुंधरां, paromparicheã -परोंपरिच्यां, ranganchéã - रंगांच्यां, fanuanneanĩ- संवण्यानिं, pufuã - पुस्वां, phatrã -फात्रां इत्यादी. हे सगळे शब्द पाहता 'ẽ' व ũ याच्या व्यतिरिक्त 'n' व 'm' हे दोन्ही वर्ण अनुस्वारासाठी वापरलेले आहेत.

'य' साठी पुन्हा 'y' आणि 'व' साठी 'v' हीच अक्षरे पोर्तुगाली पाद्रींना उचित वाटली. सहज प्रवृत्तीने 'ia' व 'ea' या जोडस्वरांचा उच्चार 'या' सारखा पोर्तुगाली भाषेत होतो. त्याचप्रमाणे 'ua' चा उच्चार 'व' होतो. त्यामुळे 'teache' किंवा 'devanchia' सारख्या शब्दांची रूपे 'त्याचे' व 'देवांच्या' अशी नागरीत लिहिल्यास ते चुकीचे ठरणार नाही. या बाबतीत विशिष्ट नियम ठरविण्यात आला होता असेही म्हणण्यास आधार नाही. म्हणून ज्या ठिकाणी जसा उच्चार वृत्ताच्या दृष्टीने योग्य वाटला तसा तो तेथे लिहिला आहे. असे जरी भेंब्रे यांचे मत असले तरी 'ea' चा उच्चार पोर्तुगाली उच्चारानुसार 'या' व्हायला हरकत नाही. उदा. dea याचा उच्चार 'देआ' असा बरोबर वाटत नाही. अगदी उच्चाराबरहुकुम तो 'देआ' असा होतो. परंतु 'द्या' असा होणे काही अंशी बरोबर वाटते. उदा. zaleari -जाल्यारि, rachũcheaca- रचुंच्याक , faueaffa- सव्यास, ranganchéã- रंगांच्यां 'ट्', 'ठ्', 'ड्', 'ढ्', 'ण्', 'ळ्', यांचा बोध व्हावा यासाठी 'tt', 'tth', 'dd', 'ddh', 'nn', 'll' हे अक्षरसमुह ठरविलेले दिसतात. परंतु त्या नियमामुळे 'त्त', 'त्थ', 'ट्ट', 'ट्ठ', 'ड्ड', 'ड्ढ', 'द्द', 'द्ध', 'न्न', 'ल्ल', 'ळ्ळ' ही जोडाक्षरे कशी बनवावी याचा गोंधळ पाद्रींच्या मनात उडाला असावा. ती जोडाक्षरे गाळून त्यांनी त्या गोंधळातून मार्ग काढलेला दिसतो. लोकभाषेत ती जोडाक्षरे रूढ नव्हती असा एक विकल्प निघतो; परंतु गोव्याबाहेरील प्रदेशाची तत्कालीन भाषा व आज गोव्यात बोलण्यात येणारी भाषा विचारांत घेतल्यास त्या विकल्पास स्थान राहात नाही.

युरोपीय पाद्री-प्रचारकांच्या श्रवणेंद्रियांस वरील उच्चारांचा सराव नसल्याकारणाने त्यांस त्या जोडाक्षरांची जरुरी भासली नाही, म्हणून ती पुराणग्रंथातून आढळत नाहीत असे अनुमान काढणेच अधिक सयुक्तिक ठरते. भेंब्रे यांचे हे म्हणणे पटण्यासारखे आहे. या ग्रंथामध्येही काही ठिकाणी असे शब्द आलेले आहेत. उदा. utam-उतम हा शब्द घेता येईल. 'वनवाळ्याचो मळो' मध्येही काही जोडाक्षरे आहेत. उदा. fatearthu-सत्यार्थु, aranneantu- अरण्यांतु, veaparu-व्यापारु, cauitua-कवित्व, famfta-सम्स्त, gnean-ग्न्यान, adeapa- अद्याप अशी काही उदाहरणे देता येतात. त्याचप्रमाणे draqhetatua-द्रखेतत्व,mahatuaca-महत्वाक अशीही उदाहरणे पाहता येतात. यामध्ये 'त्त्व' असे न येता 'त्व' असे येते याचे कारण 'ttua' असे आले असते तर ते 'ट' असे झाले असते. म्हणून कदाचित अशी जोडाक्षरे टाळलेली दिसतात.

'र्ण' जे जोडाक्षर सर्वत्र 'rn' असे लिहिलेले आढळते. पोर्तुगाली भाषेत 'र्न' हे जोडाक्षर येते. तसे संस्कृतोत्पन्नभाषेत होत नाही. 'र' नंतर 'न' चा 'ण' होतो हा नियम पाद्री अभ्यासकांस कुणी तरी लक्षात आणून दिला असावा आणि तदनुरोधाने 'ण' साठी 'nn' असे नियमानुसार लिहिण्याच्या ऐवजी एकच 'n' लिहिल्यास

पुरे आहे असे त्यांनी ठरविले असावे. एतद्देशीय भाषेत 'र्न' लिहिणे उच्चाराविरुद्ध आणि नियमबाह्य असल्याने 'rn' च्या बदली सर्व ठिकाणी 'र्ण' लिहिला आहे.

'वनवाळ्याचो मळो' यामध्येही bharnu-भर्नु, carnu - कर्नु, farnu- सर्नु या शब्दांमध्ये 'न ' आहे; परंतु काही शब्द पाहता 'र' नंतर 'न' चा 'ण' न होता 'ण' चा 'न' होतो. उदा. fampurnapanni- संपुर्नपर्णि, fouarnache-सोवर्नाचे इत्यादी. उड अनु, उडौनु; सर्वइ, सर्वै सारखे नागरीतील दोन भिन्न उच्चार रोमी लिपीत एकाच प्रकारे लिहिण्याचा कल असतो. त्यामुळे कोणते रुप मूळ ग्रंथात अस्तित्वात होते हे ठरविताना मन द्विधा होते. अशी काही उदाहरणे 'वनवाळ्याचो मळो' मध्ये पाहता येतील उदा. 'bhoutequy', 'chaddaita' हे अनुक्रमे भोउतेकी व चडइता असे होते तसेच ते भौतेकी व चडैता असेही त्याचे लिप्यंतर करता येते. प्रा. प्रियोळकरांनी ख्रिस्ती मराठी लेखकांच्या रोमन लिपीतील लिखाणाचे स्वरुप समजून घेऊन लिप्यंतर पद्धतीचे[१०] जे महत्त्वाचे निकष सिद्ध केले ते असे: १. रोमन 'anny' हा मराठी शब्द 'आणी' असा न लिहिता 'आणि' असा स्वीकारावा. असे सामान्यपणे भाषाव्यवहारात योजिले जाणारे शब्द लिप्यंतराच्यावेळी स्वीकारले जातात. प्रा. प्रियोळकरांचे मत जर मान्य केले तर त्यामध्ये शास्त्रशुद्धता आणता येणार नाही. हे लिप्यंतर काही वर्षांनंतर जर एखाद्या अभ्यासकांने अभ्यासले तर त्याच्यामध्ये गोंधळ निर्माण होईल; त्यामुळे भाषाव्यवहारात योजिले जाणारे शब्द म्हणून लिप्यंतराच्यावेळी जर ते स्वीकारले तर ते शास्त्रशुद्ध लिप्यंतर असे म्हणता येणार नाही. उदा. zhari-झरि, azi-आजि असे शब्द इ कारान्त आहेत तरीही 'आणी' हे अव्यय दीर्घान्त आलेले आहे.

२. जे शब्द मुळातच गोमंतकी भाषेत नाहीत, ते बदल करून योजिले नाहीत उदा. 'सिस्यु' (शिष्य) हा शब्द तसाच ठेवलेला आहे कारण 'ष' हे व्यंजन सतराव्या शतकातील गोव्यातील ख्रिस्ती वाङ्मयात आढळत नाही तथापि भाषेत 'श' बद्दल 'स' हे व्यंजन जुन्या मराठीत ठिकठिकाणी आढळते. 'वनवाळ्याचो मळो' मध्ये 'ष' ह्या व्यंजनाला कुठेही थारा नसला तरी 'श' व 'स' साठी वेगळी वर्णे वापरलेली आढळतात. एकंदरीत लिप्यंतर करीत असताना प्रत्येकांची विविध मते आहेत हे लिप्यंतरकारांच्या लिप्यंतर पद्धतीचे स्वरूप पाहता लक्षात येते.

**'वनवाळ्याचो मळो' चे लिप्यंतर:**

'वनवाळ्याचो मळो' या पाद्री मिगेल-द-आल्मैद यांच्या ग्रंथाचे लिप्यंतर करतेवेळी ज्या काही अडचणी निर्माण झाल्या किंवा वाचत असताना व रोमन लिपीमधून देवनागरीत लिप्यंतर करीत असताना या लिपीच्या अपरिचितांचा जो गोंधळ निर्माण होऊ शकतो, त्याचे विवेचन येथे केले आहे.

१. या ग्रंथामध्ये देवनागरी स्वर 'अ' याला रोमन प्रतिवर्ण 'A' , 'a' उदा. amolica - अमोलिक प्रा. प्रियोळकर यांच्या मतानुसार 'अ' हे कॅपिटल अक्षर योजतेवेळी ते 'अ' साठी की 'आ' साठी कळणे अवघड वाटते. उदा. Ata - आता, Aichea -आइच्या इत्यादी. जेथे संदर्भ स्पष्ट असेल तेथे हा शब्द कळू शकतो. पण जेथे संदर्भ स्पष्ट नसेल किंवा शब्द अपरिचित असेल तर लिप्यंतर करणे कठीण बनते.

२. देवनागरी स्वर 'आ' साठी रोमन प्रतिवर्ण 'A' किंवा 'a' 'वनवाळ्याचो मळो' या ग्रंथामध्ये 'अ' साठी 'a' चा वापर केलेला आहे आणि 'आ' साठी रोमन 'a' चा वापर केलेला दिसतो. उदा. anny- आणी, antafcaranna -अंतस्करण

३. 'इ' या स्वरासाठी 'I', 'i', 'j' हे प्रतिवर्ण वापरले आहेत. डॉ. प्रभुदेसाई यांच्या मते 'I', 'i', 'j' या स्वराचा

पोर्तुगीज उच्चार 'इ' असाच आहे. ऱ्हस्व 'इ' साठी 'I', 'i' या अक्षराचा उपयोग केलेला आढळतो. पण त्याच्यावर तिल ~ हे अनुनासिकाचे चिन्ह असल्यास या स्वराला अनुनासिकत्वाबरोबरच दीर्घत्वही प्राप्त होते असे त्यांचे मत आहे. उदा. muqhĩ–मुर्खी. हे एकाचवेळी अनुनासिक व दीर्घत्वासाठी येऊ शकते का? असा प्रश्न निर्माण होतो. त्याचप्रमाणे या ग्रंथामध्ये 'इ' साठी 'i' बरोबरच 'j' वापरले आहे. त्याचे लिप्यंतर करीत असताना ते पुढीलप्रमाणे होईल. उदा. donij – दोनिइ, tinij –तिनिइ, tarij– तरिइ, connij – कोणिइ, connachij–कोणाचिइ इत्यादी. दीर्घ 'ई' साठी 'y' चा उपयोग केला आहे. उदा. pauoly –पावली, cuddy –कुडी. तसेच दीर्घ 'ई' साठी laguy–लागी तर ऱ्हस्व 'इ' साठी yequi –येकि म्हणजे दीर्घ 'ई' साठी 'uy' तर ऱ्हस्व 'इ' साठी 'ui' असेही काही ठिकाणी दिसते. केवळ 'क' व 'ग' ह्या व्यंजनासाठीच त्याचा वापर केला आहे.

४. ऱ्हस्व 'उ' साठी 'u' व 'v' वापरले आहे. उदा. vparantẽ –उपरांतें, vchitaphalla– उचितफळ त्याचबरोबर 'व' चा उच्चार 'v' (लहान) आणि 'u' (लहान) अशा दोन्ही प्रकारे दाखविलेला आढळतो. साधारणत आरंभी 'v' आणि मध्ये आल्यास 'u' वापरलेले आढळते. उदा. vaincuntta –वैकुंट, Deuachem– देवाचें, vachunu –वचुनु असे होते, तर vpacara या शब्दाच्या आरंभी 'उ' व vachunu या शब्दाच्या आरंभी 'व' येते. शब्दाच्या आरंभी येणाऱ्या 'V' या अक्षरानंतर जर स्वर आला असल्यास ते 'व' होते. उदा. veuegallea –वेवेगळ्या, veaculla –व्याकुळ, vichitra– विचित्र तर 'व' हे वर्ण जोडाक्षरात आले असता त्याच्या अगोदर व्यंजन येते. उदा. draqhetatua–द्रखेतत्व, mahatuaca –महत्वाक. एरवी 'u' च्या अगोदर व्यंजन आले असता ते 'उ' असे होते. उदा. Bhagu–भागु, duqhi–दुखि इत्यादी. काही ठिकाणी 'V' च्या नंतर व्यंजन आल्यानंतरही ते 'व' होते. उदा. vhelo– व्हेलो. येथे असे म्हणता येईल की 'vh' हे देवनागरीतील एक वर्ण ठरवून एक अक्षर बनविले आहे व त्याला 'e' स्वर लावलेला आहे. तसेच vouiyanchi– वोवियांचि, viueqhita –विवेखिता यामध्ये 'v' आणि 'u' विषयी लिप्यंतरकाराचा गोंधळ होतो.

५. 'ए' साठी 'e', 'E' या वर्णाचे उपयोजन केले आहे. उदा. anumanile–अनुमानिले, te –ते, ghaddile– घडिले इत्यादी. 'e' चे बहुतेक ठिकाणी 'ए' असे होत असले तरी क्वचित ठिकाणी 'य' या अक्षरासाठीही त्याची योजना करता येऊ शकेल. उदा. Dive– दिव्य, fate– सत्य, punepauitra –पुन्यपवित्र, punea– पुन्या असे लिप्यंतर करता येईल. तसेच apulie– आपुलिए, pirluqieca–पिर्लुकिएक, Deuamogachie– देवमोगाचिए, zae– जए

६. 'ऐ' साठी 'ai' या स्वरयुग्माचा वापर केला जातो. याचे 'अइ' असेही लिप्यंतर होते. हे वास्तवही पुढील उदाहरणानुसार स्पष्ट होते. उदा. aiffe–ऐसे (अइसे), Nhai – न्है (न्हइ) इत्यादी. पण muftaitie याचे लिप्यंतर मुस्तैतिए असे न होता ते मुस्ताइतिए असे होईल. कारण येथे 'ai' च्या ऐवजी 'ai' आलेले आहे.

७. 'ओ' साठी 'O' या वर्णाचे उपयोजन केले आहे. उदा. thori–थोरि. तर guneao याचा उच्चार गुन्याओ असा होईल की गुन्याव असा होईल यामध्ये गोंधळ होतो. beparuo–बेपरुओ की बेपर्वो, gharantulio– घरांतुलिओ की घरांतुलिवो यामध्ये गोंधळ होतो.

८. 'औ' या स्वरासाठी 'ou', 'au', 'au' या स्वरयुग्माचा वापर केला जातो. त्यामुळे बराच गोंधळ होतो. त्याचे लिप्यंतर करतीत असताना 'ओउ', 'आउ' किंवा 'अउ' असा उच्चार होउ शकतो. उदा. bhoutec –भोउतेक किंवा भौतेक, faunffariquy–सौंसारिकी वा सउंसारिकी किंवा संसारिकी, faucaffa–सौकास किंवा साउकास

९. 'अं' यासाठी 'm', 'n', '~' (तिल) उदा. uncha- उंचा, fambhramu-संभ्रमु इत्यादी. ~ हा अनुनासिकासाठीचा स्वर शब्दाच्या शेवटच्या अक्षरावर दिला जातो; तसाच काही वेळा शब्दाअंतर्गत येतो. उदा. tũ -तुं, cai- काइं, vẽgũntu-वेंगांतु, vẽgõtu- वेंगंतु. येथे 'm', 'n' व '~' याचा वापर कधी करावा याला काही नियम नाही.

१०. 'अः' विसर्गासाठी अक्षरयोजना आढळत नाही. उदा. duqhi-दुखि

११. ऋ- ru अशी अक्षरयोजना आढळते.
उदा. trupta -तृप्त, amrutaphalla -अमृतफळा, drudhu- दृढ किंवा द्रुढ, greftai-ग्रेस्ताइ

१२. व्यंजने

क: c, q उदा. cumba-कुंब, yequeca -येकेक इत्यादी. तसेच Christa -ख्रिस्ता साठी 'Ch' चा वापर केला आहे.

ख: qh उदा. viueqhu-विवेखु, raqhanno- राखणो

ग: g उदा. lagale- लागले, laguy- लागी. 'स' या व्यंजनासमोर 'ue', 'ui' ही स्वरयुग्मे आल्यास 'गे' व 'गि' हे उच्चार होतात. दिर्घ 'गी' साठी अर्थातच 'uy' हे स्वरयुग्म येते. याचे कारण 'g' पुढे 'e' किंवा 'i' आल्यास त्याचा उच्चार 'जे' व 'जि' असा होतो. उदा. Egipta -इजिप्त, Evangelantulie- एवांजेलांतुलिए

घ : gh उदा. gheuncheaca-घेउंच्याक, ghaddilo-घडिलो ङ् या अक्षराला प्रतिवर्ण नाही. परंतु परसवर्णाने काही ठिकाणी दाखविता येते. उदा. comungara- कोमुङ्गार

च: ch उदा. chouthy-चौथी , chala-चाल, acharu-आचरु इत्यादी. येथे 'च' हे दंत्य आहे की तालव्य आहे हे कळणे कठिण होते.

छ: chh उदा. nichheu-निछेउ. परंतु संयुक्त अक्षर 'च्छ', 'ज्ज', 'न्न', 'त्त' यासाठी अक्षरांची योजना नाही.

ज: j , z, g 'ज' साठी 'z' चा वापरच सर्वत्र आढळतो. उदा. mazati-मजति इत्यादी. 'j' व 'g' चा वापर केवळ पोर्तुगीज शब्दांसाठी बहुदा केलेला आढळतो. उदा. Judeua-जुदेव , Igreja -इग्रेज

झ: zh उदा. prazhallita-प्रझळीत, zhuza-झुज

ञ: प्रतिवर्ण नाही.

ट: tt उदा. praghattailẽ -प्रघटैलें

ठ: tth उदा. tthai-ठाईं

ड: dd उदा. cuddi -कुडि

ढ: ddh उदा. ddhampunu- ढांपुनु

ण: nn उदा. apanne-आपणे

त: t उदा. Tari -तरि

थ: th उदा. thoriua - थोरिव

द: d उदा. nada-नाद, Deuache-देवाचे

ध: dh उदा. dharmu-धर्मु

न: n उदा. rupanilla- रुपनिळ

प: p उदा. punarapi-पुनरपि ,

फ: ph उदा. phacaita -फाकैता वा फाकइता काही ठिकाणी 'ष' हे व्यंजन केवळ पोर्तुगीज शब्दांसाठी राखून ठेवलेले दिसते. उदा. Infernantu -इनफर्नांतु

ब: b उदा. bandaqhanny- बंदखणी

भ: bh उदा. bhanddara-भांडार

म: m उदा. mogalla - मोगाळ (m या व्यंजनाचा अनुस्वारासाठीही उपयोग केला जातो.)

य: y उदा. yecachi- येकचि इत्यादी. तसेच 'y' चा उपयोग दीर्घ 'ई' साठी ही केला जातो.

र: r उदा. tari-तरि

ल: l उदा. dily-दिली

व: v, ua उदा. vachunu-वचुनु, vartalo-वर्तलो उदा. Deuachem-देवाचें

श: 'श', 'ष', 'स' या तिनीही वर्णाबद्दल लिप्यंतर करीत असताना सावधानता ठेवावी लागते.

'x' ह्या वर्णासंबंधी अधिक विचार करण्यास वाव आहे.

उदा. manuxanca-मनुसांक, मनुषांक की मनुशांक असा गोंधळ होतो. उदा. xafrapuruffu-सास्रपुरुसु की शास्रपुरुसु प्रा. प्रियोळकरांनी 'x' या अक्षराचे 'श' साठी उपयोजन केले आहे. यामुळे लिप्यंतरात मनुष्य ऐवजी मनुश्य असेच ते लिहितात. जोसेफ साल्ढाणा यांनी संपादित केलेल्या थॉमस स्टीफन्सच्या 'क्रिस्तपुराणा'चा आधार घेऊन शांताराम बंडेलू यांनी 'मनुष्य' हे शब्दरुप स्वीकारलेले दिसते त्यास त्यानी शुद्धरुप असे म्हटले आहे; परंतु ते यथामूल होत नाही असे निश्चितपणे म्हणता येते. येथे 'x' चा उच्चार 'स' होतो तसाच तो 'श' ही होऊ शकतो. लिप्यंतरात शास्त्रशुद्धता आणण्यासाठी या वर्णाला जी निश्चितता हवी आहे ती येथे जाणवत नाही. उदा. xeranna -हे 'शेरण' की 'सेरण' हे कळायला वाव नाही तसेच bhauixe-'भविस' किंवा 'भविशे' असेही होणार नाही. येथेही 'ष्य' हे जोडाक्षर रोमन लिपीमध्ये टाळलेले आहे. 'स' च्या पुढे 'इ', 'ए' हे तालव्य स्वर जर आले तर त्याचा उच्चार 'श' असा होतो. त्यामुळे 'x' चे लिप्यंतर 'श' असे केले आहे. उदा. xara-शार, xafrapuruffu-शास्रपुरुसु

ष: या अक्षरासाठी प्रतिवर्ण योजलेला दिसून येत नाही.

स: 's', 'fs', 'f' दोन स्वरांमध्ये 's' आला असता त्याचा उच्चार पोर्तुगीजमध्ये 'ज' असा होतो. त्यासाठी काही ठिकाणी 'ff' योजिलेला दिसतो. काही ठिकाणी 'ff' च्या ऐवजी 'fs' असा वर्ण आलेला दिसतो. तर काही ठिकाणी नुसतेच 'f' आलेले आहे. 'वनवाळ्याचो मळो' मध्ये आलेली काही उदाहरणे या ठिकाणी पाहता येईल. 'f' साठी उदा. famafta - समस्त, faqhi - साखि, fuargui-स्वर्गी, framu - स्रमु, fambhrama - संभ्रम, prafchita - प्रस्चित, fuabhaguy - स्वभागी, faruai - सर्वइ 'ff' साठी उदा. fihaffanari-सिहासनारि, praueffu-प्रवेसु, affafsi-आससि, daruffanna -दरुसणा 'fs' साठी उदा. apaddatafsi -आपडतासि, vaniuafsi -वनिवासि, pauafsita - पावसित, cafsy-कसी, अशी उदाहरणे पाहता येतात. 'f' ह्या वर्णाच्या आरंभी किंवा स्वराबरोबर येत असेल तर केवळ 'f' हे वर्ण येते; तर 'f' ह्या वर्णाच्या आरंभी व नंतर स्वर येत असेल तर 'ff' असे वर्ण येतात. तसेच ज्यावेळी स हे वर्ण इकारान्त असेल तर ते 'fs' अशा वर्णातून आलेले दिसते. पण याला काही शब्द अपवाद असलेले दिसतात. उदा. aifso-ऐसो. काही ठिकाणी 'स' साठी 'S' चा वापर या ग्रंथामध्ये केलेला आहे. उदा. Sipuleranty असा शब्द येतो. विशेषनाम असेल व वाक्याची सुरुवात जर 'स' या वर्णाने होत असेल तर तेथे कॅपिटल 'S' असे आढळते. Suamiaca- स्वामिआक, Sruftty - सृस्टी इत्यादी. तर काही ठिकाणी सामान्य नामासाठीही कॅपिटल 'S' असे आढळते. उदा. Sinua - सिंव Sacaru - साकरु, Saitanache - सैतानाचे, Ifaias-येथे 'स' साठी 'f' व 'S' अशी दोनीही व्यंजने वापरलेली आहेत.

त्यामुळे 'स' हे व्यंजन बराच घोळ निर्माण करणारे वाटते.

ह: h उदा. hicamaty - हिकमती, nihallunca -निहाळुंक

ळ: ll उदा. nifcallanca-निस्कळंक, ddolle-डोळे

क्ष: या अक्षरासाठी प्रतिवर्ण योजलेला दिसत नाही तसेच ज्ञ: साठीही कोणताही वर्ण नाही. 'क्ष' आणि 'ज्ञ' ही दोन अक्षरे 'qh' व 'gn' या अक्षरांनी दाखविली जातात म्हणजे त्याचा उच्चार 'ख' आणि 'ग्न' असा होतो. उदा. qhema-खेम, gneana-ग्न्यान इत्यादी. उच्चारानुसारी लिप्यंतर केल्यास 'क्ष' व 'ज्ञ' च्या ऐवजी 'ख' व 'ग्न' असे उच्चार होत असेल तर 'क्ष' व 'ज्ञ' या दोन्हीही अक्षरांचा उच्चार जेजुइतांनी केलेला नाही असे दिसून येते.

**१३. जोडाक्षरे**

जोडाक्षरे लिहिण्याच्या प्रथा दोन आहेत १. एकापुढे एक वर्ण लिहून व २. एकाखाली एक लिहून. त्यातील उदा. क्क- क्क, ल्ल–ल्ल, ट्ट–ट्ट असे शब्द 'वनवाळ्याचो मळो' मध्ये आढळून येत नाहीत. जोडाक्षरे लिहिताना ज्या क्रमाने वर्णांचा उच्चार होतो त्या क्रमाने ते वर्ण लिहिले आहे. ज्या अक्षरात काना किंवा उभी रेघ नाही त्या व्यंजनांपासून जोडाक्षर तयार करताना, त्याचा अर्धा भाग लिहिण्याच्या वेळी पुढील अक्षर त्यास जोडून येते. उदा. ड् + या = ड्या, द् + या = द्या

dharea -धऱ्या, carnu–कर्नु, prannamu- प्रणामु, pracafumu- प्रकासुमु, praptimu - प्राप्तिमु, nirmallu –निर्मळु, prarthana - प्रार्थना, arufsi –आरुसि pavitra –पवित्रा, naqhetra- नखेत्र druftti- दृस्ति, cruffachi–क्रुसाचि, bheireaca - भेइऱ्याक, hrudhauita- हृधवित, drutiuanta–द्रुतिवंत किंवा दृतिवंत येथे उच्चाराप्रमाणे रोमन अक्षरे आलेली आहेत.

**१४. कॅपिटल अक्षरे किंवा शब्द**

या ग्रंथात फक्त 'IESV' हे एकच विशेषनाम संपूर्णपणे कॅपिटल अक्षरामध्ये आलेले आहे. अशी आणखी काही उदाहरणे पाहता येतील. उदा. Deua Bapan- देव बापान, Deuagranthu–देवग्रंथु, Rayan- रायान, Deuaarca- देवआर्क, Christa –ख्रिस्ता, Taracana–तारकान, Ancuuary - आंकुवारी, Ranniyeca- राणियेक, Nai- नाइ इत्यादी. स्वर व व्यंजने यांचा विचार करता असे लक्षात येते की यातील काही वर्णांचा व व्यंजनाचा वापर कॅपिटल अक्षरामध्ये करतेवेळी वेगळ्या पद्धतीने केलेला आहे. यातील 'f' व 'u' ही दोन्ही वर्णे पाहता त्याचा वापर केवळ 'small letters' साठीच केलेला आहे. 'capital letters' योजतेवेळी या वर्णांचा वापर कुठेही आढळत नाही. उदा. MVGTIVANTA (मुग्तिवंता) येथे 'उ' साठी 'V' चा उपयोग केला आहे, तसेच 'व' साठी 'VA' चा उपयोग केला आहे. हाच शब्द 'small letter' ने योजतेवेळी तो 'mugtiuanta' असा येईल. 'u' हे वर्ण 'व' साठी उपयोजिले गेले

आहे, ते व्यंजनाबरोबर आले असता त्याचा वापर स्वराप्रमाणे केला आहे. उदा. ANCVVARY SV AMINNICHEA(आंकुवारी स्वामिणिच्या)

तसेच 'f' हे वर्ण 'स' साठी वापरले आहे. परंतु ते 'capital letters' मध्ये योजितेवळी 'S' हे वर्ण योजिले आहे.

SADHA ANCVVARY(सधा आंकुवारी)

**१५. चिन्हे**

'वनवाळ्याचो मळो' मध्ये काही चिन्हे वापरलेली आहेत. यामध्ये पूर्णविराम, स्वल्पविराम, विसर्ग, प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचक चिन्हे आढळतात.

'वनवाळ्याचो मळो' या ग्रंथामध्ये अनेक ठिकाणी लेखनाचे अनेक दोष आढळतात. यातील काही उदाहरणे पाहता येतील. उदा. एकच शब्द दोन तऱ्हेने लिहिलेला आढळतो जसे apule-apulle, zhari- zhary, cuddy-cuddi, deta- dita , काही ठिकाणी अर्धवर्ण आलेला आहे. उदा. zoddly –जोड्ली तसेच काही ठिकाणी अनुस्वार दर्शविलेला नाही. उदा. aqhadditi–अखडिति डॉ. ना. गो. कालेलकर यांच्या मते 'उच्चारलेले ध्वनी जसेच्या तसे लिहिणे हे आदर्श लेखनाचे आद्य तत्त्व आहे. तसेच शब्द जितक्या वर्णांचा बनला असेल तितके सर्व वर्ण ज्या लिपीत अनुक्रमाने वेगवेगळे व स्पष्ट लिहिले जातील ती लिपी आदर्श लिपी होय.'[११] तर प्रा. अ. का. प्रियोळकरांच्या मते "आदर्श लिपी किंवा लेखनपद्धती ती कीं, जिच्यामध्यें प्रत्येक ध्वनि एका चिन्हानें दाखविला जावा आणि प्रत्येक चिन्हाला एकापेक्षां जास्त ध्वनि नसावेत."[१२]

जे ग्रंथ आज देवनागरीत उपलब्ध आहेत त्याची मूळ प्रत उपलब्ध नाही तर जे रोमन लिपीत आहेत त्याचीही मूळ प्रत देवनागरीत असेल तर तीही उपलब्ध होउ शकत नसल्याने मूळ शब्द व्यवस्था ज्ञात होणे शक्य नाही. 'स्थ' च्या जागी 'स्छ', 'ज्ञ' च्या जागी 'ग्न', 'क्ष' च्या जागी 'ख' अशी काही उदाहरणे देता येतील. अशावेळी आज वापरांत असलेली संशोधित पद्धती वापरणे इष्ट ठरते. रोमन लिपीमध्ये 'छ्' साठी 'chh', 'ण' साठी 'nn', 'ड्' साठी 'dd', 'ळ' साठी 'll' असे वर्ण वापरण्यात येत असत. जे शास्त्रीयदृष्टया अचूक वाटतात. असा वापर आजच्या लेखनामध्ये होत नाही. आज रोमन लिपीतील लिप्यंतर वाचत असताना अनेक चुका संभवतात. त्याला शास्त्रीय बैठक असलेली कुठेच जाणवत नाही. उच्चारण लेखनातील एकरुपता पाहताना देवनागरी लिपीत जसे लिहिले जाते तसेच सर्व साधारणपणे उच्चारले जाते, आणि जसे उच्चारले जाते तसेच जवळ जवळ लिहिले जाते. यातील 'इ' व 'उ' हे दोन स्वर 'ई' व 'ऊ' द्वारे त्याचे दीर्घत्व दाखविता येते पण इतर स्वरांचे दीर्घत्व दाखविता येत नाही. तसेच 'च', 'ज', 'झ' हे वर्ण दोन तऱ्हानी उच्चारले जातात उदा. 'च' व 'च्य' याचा उच्चार करताना गोंधळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यावरून सगळ्या लिपी ह्या सदोष ठरतात. मिशनऱ्यांनी अनेक धर्मग्रंथ हे रोमन लिपीतच लिहिले. रोमन वर्णमालेतील २६ अक्षरांनाच ठराविक संकेत देऊन गोव्यातील भाषेचे रोमनीकरण त्यांनी केले आहे. रोमनलिपीचे देवनागरीत रुपांतर करीत असताना उच्चारानुसारी पद्धतीने करणे अशक्य आहे कारण त्या काळी लोक उच्चार कसे करीत असतील हे आज कळणे शक्य नाही, त्यामुळे उच्चारांप्रमाणे ध्वनिलेखन करण्याच्या बाबतील मतभिन्नता राहील. म्हणूनच एखाद्या शब्दाच्या उच्चाराचा विचार केल्यास तो 'श', 'ष' की 'स' हे कळण्यास मार्ग नाही, हे प्रा. प्रियोळकरांचे मत मान्य होते.

सर्वसाधारणरित्या रोमी लिपीतील उच्चार जसेच्या तसे ठेवल्याने सामान्य वाचकांचा किंचित गोंधळ उडण्याचा संभव आहे; परंतु भाषाभ्यासकांची सोय लक्षात घेता तसे करणे आवश्यक आहे. एकंदरीत एखाद्या भाषेतील लिपीचे लिप्यंतर करीत असताना ते मुळाबरहुकुम शास्त्रशुद्ध पद्धतीने केले जावे कि जेणेकरून त्या भाषेचे पुन्हा मूळलिपीमध्ये लिप्यंतर करायचे असेल तर ते जसेच्या तसे झाले पाहिजे की ज्यामुळे भाषेचा अभ्यास करणाऱ्यास तत्कालीन भाषिक रुपे तपासता येतील.

**संदर्भ ग्रंथ:**


१. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, लेख भौगोलिक व्याप्ती..., लेखक- प्रकाशचंद्र पां. शिरोडकर, पृ.११,संपा. प्रभुदेसाई, घवी

२. प्रियोळकर अ. का., जेजुइटांचे मराठी वाङ्मयकार्य ओझरती ओळख, यशवंत-अंक ८८ वा, पृ. ५० ३. उ. नि., सतराव्या शतकातील गोमंतकी बोली, मुंबई, १९६३, पृ. १०७, मूळ ग्रंथ A. K. Priolkar, "Two Recently Discovered Letters of Fr. Thomas Stephens, " The Journal of the University of Bombay, Vol. XXV, Part 2, September 1956, p.123

४. भेंब्रे प्रभु, लक्ष्मीकांत व्यंकटेश, पुर्तुगाली राजवटीपूर्वीचे गोव्यातील धार्मिक वाङ्मय, गोवा, १९७९, पृ. २६

५. फादर स्टीफन्स व त्यांचे क्रिस्तपुराण, स. गं. मालशे, मुंबई, १९६५, पृ. १२

६. उ. नि., सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली, मुंबई, १९६३, पृ. १०९

७. उ. नि., सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली, मुंबई, १९६३, पृ. १०९

८. उ. नि., सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली, मुंबई, १९६३, पृ. १०९
९. उ. नि., पुर्तुगाली राजवटीपूर्वीचे गोव्यातील धार्मिक वाङ्मय, प्रस्तावना, गोवा, १९७९, पृ. २८
१०. तडकोडकर, सु. म., मराठीच्या प्रवासातील वाङ्मयीन पाऊलखुणा, गोवा, २००२, पृ.४३
११. कालेलकर, ना. गो., ध्वनिविचार, पुणे, १९५५, पृ.१५५
१२. प्रियोळकर, अ. का., ग्रांथिक मराठी भाषा व कोंकणी बोली, पुणे, १९६६, पृ. ४२

❖ ❖ ❖